Series #CDBA

**SET-4**

प्रश्न-पत्र कोड
Q.P. Code **8**

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थी प्रश्न-पत्र कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

- प्रश्न-पत्रिकेत **11** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेत **8** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.

- Please check that this question paper contains **11** printed pages.
- Please check that this question paper contains **8** questions.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- **Please write down the Serial Number of the question in the answer-book before attempting it.**
- 15 minutes time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : **3** तास*
*निर्धारित समय : **3** घंटे*
*Time allowed : **3** hours*

*गुण : **80***
*अधिकतम अंक : **80***
*Maximum Marks : **80***

**General Instructions :**

*(i)* *Question paper is divided into* ***Four*** *sections.*

*(ii)* *It has total* ***08*** *questions.*

*(iii)* ***Section A : 02*** *Questions No.* ***1 & 2***

*(iv)* ***Section B : 02*** *Questions No.* ***3 & 4***

*(v)* ***Section C : 03*** *Questions No.* ***5, 6 & 7***

*(vi)* ***Section D : 01*** *Questions No.* ***8***

*(vii)* *Attempt questions as per specific instructions.*

*(viii)* *Write questions no. in answer book before attempting it.*

***सर्वसाधारण सूचना :***

*(i)* *या प्रश्नपत्रिकेत –* ***अ, ब, क, ड*** *– असे* ***चार*** *विभाग आहेत.*

*(ii)* *सर्व विभाग आवश्यक आहेत.*

*(iii)* ***यथाशक्य*** *सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.*

*(iv)* *एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमाने च यावीत.*

**विभाग – 'अ' – वाचन व आकलन (15 गुण)**

**Section – 'A' – Reading and Comprehension (15 Marks)**

1. खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

आनंद हा ज्ञानाप्रमाणे देण्याने वाढतो. दुसऱ्या माणसाला आपल्या आनंदात सहभागी करुन घेतल्याने तो द्विगुणित होतो. घरी आलेला एखादा आनंदी खेळकर पाहुणा संपूर्ण घर प्रसन्नतेने भरुन टाकतो. त्यामुळे ते घरही त्याला अधिक आनंद देण्याचा प्रयत्न करते. आपण एखादी सुंदर वस्तू खरेदी केली असेल तर ती दुसऱ्याला दाखवल्याशिवाय चैन पडत नाही. आनंद भोगायलाही कोणाचीतरी सोबत हवीशी वाटते. यामुलेच हवेलीत राहणाऱ्या आणि सर्व सुखांत लोळणाऱ्या श्रीमंतापेक्षा सडकेवर भटकणार कलंदर माणूस जास्त आनंदी असू शकतो.

निसर्ग हे आनंदाचे मूर्तिमंत प्रतिक आहे. निसर्ग कधी दुःखी असतो का ? सकाळ होताच टवटवीत होऊन वाऱ्याबरोबर डोलणारी झाडे, किलबिल करणारे, मोहक हालचाल करणारे पक्षी, फुलामध्ये बागडणारे फुलपाखेर, खळखळाट करत धावणारी नदी ही सर्व निसर्गाची रूपे आपला आनंद उधळत असतात. "आम्ही आनंदी आहोत. तुम्हीही आनंदी व्हा" असाच संदेश जणुकाही ती आपल्याला देत असतात.

आनंदाची अशी अनेकविध रूपे आपल्याळा ठायी ठायी दिसत असतात. अशा परिस्थितीत दुःखी राहणे म्हणजे पाण्यात राहून कोरडे राहणेच नव्हे काय ? काविळ झालेल्या माणसाला ज्याप्रमाणे सारे जग पिवळे दिसते, त्याप्रमाणे दुःखी माणसाला सगळीकडे दुःखच भरलेले दिसते. म्हणून आनंदी होण्यासाठी एक उत्तम उपाय म्हणजे स्वतःच्या दुःखाचा विचार सोडून दुसऱ्याच्या दुःखाचा विचार करणे व ते कमी करण्याचा प्रयत्न करणे अशा प्रकारे आनंदाचे उगमस्थान हे मनच असते.

(a) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यांयामधून निवडा. (कोणतेही-**3**) **3 × 1 = 3**

(I) आनंद कशामुळे वाढतो ?

(अ) साठवल्याने (ब) ज्ञानाने

(क) जपून ठेवल्याने (ड) देण्याने

(II) आनंद भोगण्यासाठी कशाची जरुरी असते ?

(अ) पैशाची (ब) कोणाच्यातरी सोबतीची

(क) वेळेची (ड) आरोग्याची

(III) आनंदाचे मूर्तिमंत प्रतीक कोणते ?

(अ) संपत्ती (ब) मैत्री

(क) निसर्ग (ड) घर

(IV) आनंदाचे उगमस्थान कोणते ?

(अ) मन (ब) पैसा

(क) फुले (ड) निसर्ग

(b) खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा. (कोणतेही-**3**) **3 × 1 = 3**

(I) संपूर्ण घर प्रसन्नतेने कोण भरुन टाकतो ?

(II) निसर्गाची विविध रूपे कोणता संदेश देतात ?

(III) हवेलीतील श्रीमंतापेक्षा जास्त आनंदी कोण असू शकतो ?

(IV) दुःखी राहणे म्हणजे काय ?

(c) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तर लिहा. (कोणतेही-**1**) **1 × 2 = 2**

(I) लेखकाने निसर्गातील कोणकोणत्या विविध रूपांचा उल्लेख केला आहे ?

(II) आनंदी होण्याचा उत्तम उपाय कोणता ?

2. खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

प्रभातकाळी तुझी लागली ओढ मायबोली
भवती गुंजे तव गुणगानी मंगल भूपाळी
ज्ञानामृत गे तुला पाजिले संत ज्ञानदेवे
नाथ समर्थे तुझी फोडिली शब्दांची पेवे
भक्त तुका तव तार छेडिता जनमत आंदोळे
साथ कराया भवती जमले संतांचे मेळे
शिवशाहीचे भाट वाहती तुला कुर्निसात
शृंगारावरि वीररसाची झाली बरसात
चलन पटविती तुझे घोंगडे मर्द गावढाळ
जिवट किती ही मूस रांगडी तुझी टाकसाळ
रोखठोक हा नाद छणाणे नित रानोमाळी
भवती गुंजे तव गुणगानी मंगल भूपाळी

(a) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 3) **(3 × 1 = 3)**

(I) कवीला कशाची ओढ लागली आहे ?

(अ) कविता (ब) मायबोली

(क) मराठी भाषा (ड) भूपाळी

(II) 'भाट' या शब्दाचा अर्थ काय आहे ?

(अ) नोकर (ब) थाटमाट

(क) सैनिक (ड) स्तुतीपाठक

(III) भूपाळी केव्हा म्हटली जाते ?

(अ) दुपारी (ब) रात्री

(क) प्रभातकाळी (ड) कोणत्याही वेळी

(IV) भक्त तुकारामांना साथ कोणी केली ?

(अ) संतांच्या मेळ्याने | (ब) वीणेच्या तारांनी

(क) लोकांनी | (ड) भक्तांनी

(b) कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 4) $4 \times 1 = 4$

(I) मायबोलीला ज्ञानामृत कोणी पाजले आहे ?

(II) कवितेमध्ये कोणकोणत्या संतांचा उल्लेख आला आहे ?

(III) 'कुर्निसात' या शब्दाचा अर्थ काय आहे ?

(IV) रानोमाळ वाजणारा नाद कसा आहे ?

(V) मायबोलीची टाकसाळ कशी आहे ?

## विभाग – 'ब' व्याकरण (20 गुण)
## Section – 'B' Grammar (20 Marks)

3. (a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4) $4 \times 1 = 4$

(I) भाववाचक नामाचा योग्य पर्याय

(अ) सागर | (ब) गवत

(क) गट | (ड) समता

(II) खालीलपैकी योग्य विधाने कोणती ?

(i) कर्म म्हणजे कार्य करणारी व्यक्ती होय.

(ii) कर्म म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा शब्द होय.

(iii) क्रिया ज्याच्यावर घडते तो शब्द होय.

(iv) क्रियापदाने दाखविलेली क्रिया जो करतो, तो शब्द होय.

(अ) विधान (i) बरोबर | (ब) विधान (iii) बरोबर

(क) विधान (i) व (ii) बरोबर | (ड) विधान (iv) बरोबर

(III) खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते ?

(अ) डोंगरावर मोठे वृक्ष आहेत.

(ब) तिने रंगीत कागद आणले.

(क) सरिताने पिकलेला पेरू खाल्ला.

(ड) सोनालीने मला मदत केली.

(IV) खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य शब्दयोगी अव्ययाचा पर्याय वापरा.

घरा.....शाळा लांब आहे.

(अ) समोर (ब) साठी

(क) पासून (ड) वर

(V) वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

बाप रे ! केवढा मोठा साप हा !

(अ) केवळप्रयोगी अव्यय (ब) भाववाचक नाम

(क) शब्दयोगी अव्यय (ड) विशेषण

(b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3) **3 × 1 = 3**

(I) त्याने यशासाठी प्रयत्न करावेत. – वर्तमानकाळातील वाक्य बनवा.

(II) तिला फार आनंद झाला होता. – भविष्यकाळातील वाक्य तयार करा.

(III) शीतल स्वयंपाक करते. – भूतकाळातील वाक्य तयार करा.

(IV) मी घर स्वच्छ ठेवले होते. – काळ ओळखा

(c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3) **3 × 1 = 3**

(I) मुलांनी अभ्यास केला. (आज्ञार्थी वाक्य बनवा)

(II) संगिताला परिक्षेत यश मिळाले. (विधानार्थी नकारात्मक वाक्य बनवा)

(III) अरे वा ! काय सुंदर शिल्प आहे हे ! (वाक्याचा प्रकार ओळखा)

(IV) वृद्धांना मदत केली पाहिजे. (प्रश्नार्थक वाक्य करा)

(d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) **2 × 1 = 2**

(I) खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता ते ओळखा.

देव, पक्षी, विद्यार्थी, बाई

(II) गाडी सावकाश चालली होती.

(अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करुन वाक्य पुन्हा लिहा.)

(III) 'मिरची' – या शब्दाच्या अनेकवचनाचा शब्द लिहा.

4. (a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(I) खालीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा.

(अ) हिरवळ (ब) शेती

(क) डोंगर (ड) टेकडी

(II) लिंग वचनानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा.

(अ) शाळा (ब) लेखणी

(क) वही (ड) फळा

(III) पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता ?

(अ) फळा (ब) माणूस

(क) गवत (ड) वीट

(b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(I) खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

(अ) माणूस–मानव (ब) जर–तर

(क) कर्ण–पर्ण (ड) खडा–वडा

(II) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

(अ) आई (ब) माता

(क) पिता (ड) जननी

(III) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

(अ) वृक्ष (ब) फूल

(क) झाड (ड) तरू

(c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(I) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

(अ) समान × भासमान (ब) सुरूप × अनुरूप

(क) मागील × खालील (ड) स्वच्छ × अस्वच्छ

(II) 'मित्रत्व' या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा योग्य शब्द

(अ) महत्त्व (ब) शत्रुत्व

(क) बंधुत्व (ड) विद्वत्व

(III) 'स्वकीय' या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा शब्द

(अ) परकीय (ब) राजकीय

(क) संबंधी (ड) आदरणीय

(d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(I) खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता ?

(अ) चहापाणी (ब) चरणकमल

(क) अनंत (ड) अनुवाद

(II) ज्या समासाचे पहिले पद अव्यय असून ते महत्त्वाचे असते, अशा समासाला........समास असे म्हणतात.

(अ) द्विगु समास (ब) अव्ययीभाव समाहार

(क) इतरेतर द्वंद्व समास (ड) वैकल्पिक द्वंद्व समास

(III) खालील शब्दाचा समास ओळखा.

'चारपाच'

(अ) समाहार द्वंद्व (ब) अव्ययीभाव

(क) वैकल्पिक द्वंद्व (ड) इतरेतर द्वंद्व

## विभाग–क–पाठ्यपुस्तक आधारित (30 गुण)

## Section – 'C' – Text book based (30 Marks)

5. (a) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3) $3 \times 1 = 3$

(I) लेखकाच्या मते शालीमुळे शालीनता येते की जाते ?

(II) वजन कमी करण्यासाठी पंतांनी पहिला उपाय कोणता केला ?

(III) डॉ. माशेलकरांना भावे सर कोणता विषय शिकवीत असत ?

(IV) निरंजन कोणाकडे रहात होता ?

(V) अब्दुल तपोवनामध्ये कशासाठी जात होता ?

(b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही 3)

$3 \times 1 = 3$

(I) कथेची थोरली बहीण म्हणजे.....

(अ) कविता (ब) कादंबरी

(क) अलंकार (ड) गाणी

(II) आई हीच प्रत्येक मुलाची........असते.

(अ) आदर्श (ब) मार्गदर्शक

(क) पहिली शिक्षक (ड) श्रद्धास्थान

(III) सगळ्यात भारी ॲप ........असते.

(अ) मोबाईल मध्ये (ब) लॅपटॉपमध्ये

(क) मेंदूमध्ये (ड) डोक्याच्या कवटीत

(IV) अब्दुलचा सत्कार .........केला.

(अ) रघुभैय्यानी (ब) दाजी साहेबांनी

(क) आश्रमवासियांनी (ड) ट्रस्टींनी

(V) पंतांच्या कचेरीत सेक्शनला पार्टी ...... यांनी दिली होती.

(अ) अण्णा नाडगौडा (ब) सोकाजी त्रिलोकेकर

(क) जगदाळे (ड) जनोबा रेगे

(c) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे **40** के **50** शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही 1) **1 × 3 = 3**

(I) 'या घटनेची ऊब पुलकित शालीच्या ऊबेपेक्षा अधिक होती.' या वाक्याचा तुम्हाला जाणवलेला अर्थ लिहा.

(II) आपण ग्लोबल वॉर्मिंगला हातभारच लावतो हे बाबांचे मत तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(III) पाठाआधारे कविता या साहित्यप्रकाराचा परिचय तुमच्या शब्दांत करुन द्या.

(d) कंसात दिलेल्या वाकप्रचारांचा खालील वाक्यांमधील योग्य त्या ठिकाणी वापर करुन वाक्य पुन्हा लिहा. **5 × 1 = 5**

(आर्जव करणे, तृप्त करणे, ऋण असणे, धीर न सोडणे, वाव असणे)

(I) श्रेष्ठ गायकांची गाणी कानाला व मनाला समाधान देतात.

(II) सुखदने रजा देण्यासाठी वरिष्ठांची खूप विनवणी केली.

(III) कठीण प्रसंगी त्याला मदत केलेल्या मधुरचे त्याच्यावर फार मोठे उपकार आहेत.

(IV) दुष्काळामुळे शेतीचे मोठे नुकसान होऊनही तो खचून गेला नाही.

(V) शहरामध्ये नोकरी मिळण्याच्या खूप संधी उपलब्ध असतात.

6. (a) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या. (कोणतेही 4) **4 × 1 = 4**

(I) हरणी पाडसाची चिंता केव्हा करते ?

(II) कवी नारायण सुर्वे यांच्या मदतीस कोण धावून आले ?

(III) कवीला श्रावणाचे हास्य कोठे दिसते ?

(IV) कवयित्रीला डोळे भरुन काय पहावेसे वाटते ?

(V) संत नामदेवांनी मेघ कोणास म्हटले आहे ?

(VI) सैनिकाचे पाऊल कसे आहे ?

(b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही 4) **4 × 1 = 4**

(I) हे हात माझे........, दारिद्र्याकडे गहाणच राहिले.

(अ) दोन्ही (ब) पवित्र

(क) सर्वस्व (ड) अजूनही

(II) नाही........द्रव्य, नाही शिरेमध्ये रक्त.

(अ) हातामध्ये (ब) मुठीमध्ये

(क) खिशामध्ये (ड) देण्यासाठी

(III) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या....... ।

(अ) जयजयकार (ब) अवतार

(क) ललकार (ड) अधिकार

(IV) तैसा धावे माझिया काजा । ........ मी दास तुझा ।।

(अ) देवा (ब) अंकिला

(क) दीन (ड) अपराधी

(V) भाकरीचा........शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

(अ) तुकडा (ब) चंद्र

(क) आधार (ड) गाव

(c) खालीलपैकी काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. (कोणतेही 1) **1 × 3 = 3**

(I) दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शळित शिकलो.

(II) श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते

7. (a) खालीलपैकी प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही 3) **3 × 1 = 3**

(I) लेखकाने वेल्डर व फोरमनची मागणी केल्यावर त्यांना कोणते उत्तर मिळाले ?

(II) पाठामध्ये कोणत्या वाक्प्रचाराची व्युत्पत्ती सांगितली आहे ?

(III) होमी भाभांना काम करणाऱ्यांची कोणती वृत्ती चुकीची वाटत होती ?

(IV) व्युत्पत्ती कोशाचे कोणतेही एक कार्य लिहा.

(b) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे **40** से **50** शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही 1) **1 × 2 = 2**

(I) दुसऱ्या अनुभवातून डॉ. काकोडकर कोणता धडा शिकले ?

(II) सुलभीकरणामुळे भाषेमध्ये बदल कसे होतात, ते स्पष्ट करा.

## विभाग–'ड' लेखन (15 गुण)
## Section – 'D' Writing (15 Marks)

8. (a) खलीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे **200-250** शब्दांत निबंध लिहा. **1 × 6 = 6**

महापूर : एक संकट

मानवाची वैज्ञानिक प्रगती – निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न – ग्लोबल – वॉर्मिंग – निसर्गातील बदल – महापूर – जीवित हानी – वित्तहानी – उपाय

**किंवा/OR**

मोबाईलवर बंदी आली तर –

आजचे मोबाईलचे वेड - फायदे - तोटे – जगाशी संपर्क नाही – दुरावा – एकाकीपणा

**किंवा/OR**

शेतकऱ्याचे मनोगत

सामान्य शेतकरी – मुले, पत्नी – शेतात कष्ट – निसर्गाचा अनियमितपणा – मोबदला कमी – गावे ओस – कुटुंबाच्या जबाबदाऱ्या – जीवनअवघड.

(b) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा. कथेला शीर्षक द्या.व तात्पर्य लिहा. (कोणतेही 1) **1 × 5 = 5**

एका माणसाकडे गाढव – नदी पार करुन ओझे नेणे – मिठाची पोती – गाढव पाण्यात बसते – मीठ विरघळते – ओझे कमी – गाढवाची लबाडी – दुसऱ्या दिवशी कापसाची पोती – पाण्यात बसते – पोतीजड – गाढवाला पश्चाताप.

**किंवा/OR**

शेतकऱ्याचा मुलगा – खोटे बोलण्याची सवय – आईवडील शेतावर – मुलगा सांगतो चोर आला – फसवतो – एकदा खरेच चोर येतो – मुलगा चोर आल्याचे सांगतो – खोटे समजून दुर्लक्ष करतात. – घरात खरेच चोरी – मुलाला चोप.

(c) खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाला आवश्यक) (कोणतेही 1) **1 × 4 = 4**

तुम्ही राजन/रजनी मिरजकर, बुधवार पेठ, सोलापूर येथील शारदा वाचनालयाचे व्यवस्थापक आहात. त्यासाठी मागणी केलेली पुस्तके अद्याप न मिळाल्याची तक्रार करणारे पत्र सरस्वती बुक डेपो, दादर मुंबई यांना लिहा.

**किंवा/OR**

किशोर / कविता साठे, वारजे, पुणे 41107 येथील रहिवासी आहात. तेथून विश्रांतवाडी पुणे येथे बसेस वेळेवर सोडण्याची मागणी करणारे पत्र आगार व्यवस्थापक, पुणे यांना लिहा.